अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील महत्वाच्या स्थंळाचा विकास करणे याअंतर्गत जेतवन बहुउदेशिय संस्था, हिवरी ता.जि.यवतमाळ या स्थळाच्या विकास कामास मंजुरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : स्वसेअं-२०१८/प्र.क्र.७६(०१)/ बांधकामे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०७ मार्च, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. बीसीएच-२०१४/प्र क्र. ६१/बांधकामे, दि. १६.१२.२०१५

२) आयुक्त, समाज कल्याण, आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. सकआ/ मावक/ ऐति. स्थळे /जेपस्थ/हिवरी, यवतमाळ/२०१७/का-१२/३९७, दि. १६.०३.२०१७.

३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन पत्र क्र. बैठक -२०१७/ प्र क्र. ३३८/बांधकामे, दि. १६.०९.२०१७ चे इतिवृत्त.

४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. बीसीएच-२०१४/ प्र.क्र.६१/बांधकामे, दि. ०५.०३.२०१८

प्रस्तावना :-

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील मान्यवर व्यक्तींची स्मारक बांधणे तसेच महत्वाच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थळांचा विकास करण्याच्या दृष्टीने स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजूर करण्याविषयीचे निकष मार्गदर्शक तत्वाचा संदर्भ क्र. १ व संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या विहित कार्यपध्दती नुसार संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये, आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांनी, जेतवन बहुउद्देशीय संस्था, हिवरी ता. जि. यवतमाळ या स्वयंसेवी संस्थेचा जेतवन, ता. हिवरी ता. जि. यवतमाळ या स्थळाच्या विकास कामास मंजूरी देणेबाबत रु. २,१९,६९,०४०/- (रुपये दोन कोटी एकोणीस लाख एकोणसत्तर हजार चाळीस फक्त) इतक्या खर्चाच्या प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर केला आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकात विपश्यना ध्यानकेंद्र, ग्रंथालय इत्यादी बांधकाम करणे प्रस्तावित आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक खाजगी सल्लागार अभियंता, यांनी तयार केले असून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १, यवतमाळ यांनी साक्षांकित केले आहे.

मा. मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या दि. ०१.०६.२०१७ रोजी झालेल्या बैठकीस सदर कामास रु. २.०० कोटीच्या मर्यादेत तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. तद्नुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केल्याप्रमाने रु.२,१९,६९,०४०/- या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आयुक्त, समाज कल्याण, आयुक्तालय, पुणे यांनी जेतवन, हिवरी ता. जि. यवतमाळ या स्थळाच्या विकास कामास मंजूरी देण्याबाबतचा जेतवन बहुउद्देशीय संस्था, हिवरी ता. जि. यवतमाळ या संस्थेकडून सादर करण्यात आलेला रु. २,१९,६९,०४०/- (रुपये दोन कोटी एकोणीस लाख एकोणसत्तर हजार चाळीस फक्त) इतक्या खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर केला असून प्रस्तावाच्या अंदाजपत्रकातील तांत्रिक बाबीची तपासणी करण्याकरीता सदर प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविण्यात आला असता सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर कामाच्या प्रस्तावास रु. २,१९,६९,०४०/- (रुपये दोन कोटी एकोणीस लाख एकोणसत्तर हजार चाळीस फक्त) इतक्या रक्कमेस मान्यता देण्यास सहमती दर्शविली आहे. दि. ०१.०६.२०१७ रोजी मा. मंत्री (सा. न्या.) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सदर कामास रु. २.०० कोटीच्या मर्यादेत मान्यता प्राप्त झालेली असल्याने रु. २.०० कोटी रक्कमेव्यतीरिक्त येणारा खर्च रु. १९.६९ लक्ष तसेच दि. १६.१२.२०१५ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार रु. २.०० कोटीच्या १० टक्के रक्कम संस्थेने खर्च करावा. या अटीच्या अधीन राहून सदर कामास सार्वजनिक बांधकाम विभागाने सहमती दर्शविल्याप्रमाने रु.२,१९,६९,०४०/- (रुपये दोन कोटी एकोणविस लाख एकोणसत्तर हजार चाळीस फक्त) इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अटी व शर्ती

१) अंदाज पत्रकात नमूद रु. २.०० कोटी रक्कमेवरील (रु. १९,६९,०४०/-) ही रक्कम संस्थेने स्वत:च्या निधीतून खर्च करावी.

२) तसेच रु. २.०० कोटीच्या मर्यादेतील रक्कमेच्या १० टक्के रक्कम (रु. २०.०० लक्ष) संस्थेने खर्च करणे बंधनकारक आहे. म्हणजेच संस्थेचा हिस्सा रु. ३९.६९ लक्ष असा राहील. शासनाचा हिस्सा रु. १ कोटी ८० लक्ष राहील.

३) प्रस्तुत प्रकल्पाच्या सविस्तर प्राकलनास मुख्या अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रादेशिक विभाग अमरावती यांचे साक्षांकन घेण्यात यावे.

४) काम सुरु करण्यापूर्वी प्रकल्पाचा नमूना, नकाक्षा, वस्तुमांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तु विशारदाकडून मंजूरी घेण्यात यावी. तसेच प्रकल्पाचे बांधकाम हाती घेण्यापूर्वी स्थानिक नगर रचना प्राधिकारणाची मंजूरी घेण्यात यावी.

५) या कामी शासन निर्णय क्र. बीसीएच-२०१४/प्र क्र. ६१/बांधकामे, दि. १६.१२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीने नियमानुसार ई निविदा प्रक्रीय राबवून बांधकाम यंत्रणा निश्चित करुन काम हाती घेणे.

६) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही -२०१३/प्र क्र. १७७/ता. क. दि. १०.०१.२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

७) प्रस्तुत प्रकल्पाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागने विहित केलेल्या मानकानुसार विहित दर्जेचे व गुणवत्तेचे राहिल याकरीता प्रकल्पाचे सा. बा. वि. च्या सक्षम प्राधिकारामार्फत नियतकालीक तपासणी करुण घेणे आवश्यक राहिल.

८) प्रस्तुत प्रकल्पातील इमारत बांधकामामध्ये ग्रीन बील्डींग संकल्पना अमलात आणून नैसर्गिक प्रकाश योजना व वायू विजन, पाण्याच्या व उर्जेच्या वापरात कातकसर, पर्जन्य जलपुन: भर्रण आणि जास्तीत जास्त पर्यावरणपूरक बांधकाम साहित्य व साधन सामग्रिचा वापर करणे आवश्यक राहिल.

९) प्रस्तुत प्रकल्पातील बांधकामाचा कालावधी निश्चित करून ते विहित वेळेतच पूर्ण होईल याची संबधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी दक्षता घ्यावी.

१०) प्रकल्पाच्या देखभाल व परिरक्षणाची जबाबदारी ही जेतवन बहुउद्देशीय संस्था, हिवरी ता. जि. यवतमाळ या संस्थेची राहिल.

११) प्रस्तुत प्रक्रल्पांना सोयीसुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने रॅम्प, रेलींग, व तत्सम सुविधा निर्माण करणे बंधनकारक राहील.

२. संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयात नमूद मार्गदर्शक तत्वांचे पालन करून जेतवन बहुउद्देशीय संस्था, हिवरी ता. जि. यवतमाळ या संस्थेने हाती घेतलेल्या प्रकल्पावर सनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी सदर शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तर समितीची राहिल. परिच्छेद ३ मध्ये नमूद सर्व अटी जेतवन बहुउद्देशीय संस्था, हिवरी ता. जि. यवतमाळ यांना मान्य असल्याबाबत करारपत्र करुन घ्यावे. शासनाच्या वतीने करारपत्रावर सही करण्यासाठी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, अमरावती यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, यवतमाळ यांनी प्रकल्पाच्या बांधकामाच्या सद्यस्थितीचा त्रैमासिक अहवाल आणि वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाण पत्र शासनास व आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांना वेळीच सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. सदर बांधकामावरील खर्च हा मागणी क्र. एन ०३, २२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागस वर्गीय व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०१ - अनुसूचित जातीचे कल्याण , ८०० - इतर खर्च, पंचवार्षीक योजना अंतर्गत योजना राज्य योजना अंतर्गत योजना (०५), स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक आनुदाने (०५) (०२), संस्थांना सहाय्यक अनुदाने (वि.घ. यो.) (२२२५ ३६३६), ३१ - सहाय्यक अनुदाने, (वेतनेत्तर) (योजनांतर्गत -दत्तमत) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वर्षात मंजूर अर्थसंल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर योजने अंतर्गत आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे यांना नियंत्रक, आहरण व सवितंरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच योजनेअंतर्गत मंजूर निधीचे वितरण हे संदर्भ क्र. १ येथिल शासन निर्णयातील परिच्छेद २ (२) मध्ये नमूद अटीच्या अधीन काटेकोरपणे करण्याची जबाबदारी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांची राहील.

५. प्रस्तुतचा शासन निर्णय, वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग पाच, अनुक्रमांक १, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र. १३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्यांचा संगणक सांकेतांक क्र. २०१८०३०७१५०२१६१०२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.03.07 15:04:14 +05'30'

(अनिल को. आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त, समाज कल्याण, आयुक्तालय, पुणे
२) उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई
३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, मुंबई
४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, यवतमाळ
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, यवतमाळ
६) समन्वय तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (इमारती), विभाग पुणे
७) महालेखापाल, महाराष्ट्र ½ (लेखापरिक्षा/लेखाअनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
८) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, अमरावती
९) सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, यवतमाळ
१०) जिल्हाकोषागार अधिकारी, यवतमाळ
११) अध्यक्ष/सचिव, जेतवन बहुउद्देशीय संस्था, हिवरी ता. जि. यवतमाळ
१२) निवडनस्ती.